FORM-1A

N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154164

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. मुंबई, पहिली खबर क्र. FIR No. ०६, वर्ष Year २०२२, दिनांक Date १६/०२/२०२२
2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. अधिनियम १९८८, कलमे Sections ७, १२
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........
3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day गुरुवार, तारीख पासून Date from ११/२/२२ वेळ Time ११.३० तारीख पर्यंत Date to १५/२/२२ वेळ Time १३.४५ वा.
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date ११/०२/२०२२ वेळ Time ........
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०४/२०२२ तारीख Date १६/०२/२२ वेळ Time ०६.३० वा
4. माहितीचा प्रकार Type of Information : मौखिक, लेखी / तोंडी Written / Oral ........
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. ........
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name पी/नॉर्थ मनपा कार्यालय मालाड (प) मुं.६४ ठिकाणाचे नंबर No. if any ........, गल्ली Ward ........, रस्त्याचे नाव Name of road मामलेतदारवाडी
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्री अरविंदसिंह जडुभा जाडेजा (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name जडुभा जाडेजा
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ६० वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ९८६९०४४६६६
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation दुकानदार
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste जाडेजा/क्षत्रीय जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address : ........, गल्ली / सर्व्हे नं. Ward ........ घर / नाव नं. House/Name No. ........ फोन / मो. नं. Phone/Mo. No. ........ पॅन नं. PAN No. ........ वोटर्स नं. Card No. ........
   रस्त्याचे नाव Road ........, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, पो. स्टे. P. Stn. ........
   तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address रुम नं. २२, प्लॉट नं. ३१९, आशिर्वाद सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, मंगलमूर्ती जवळ, चारकोप सेक्टर नं. ३, कांदिवली (प) मुं-६७.
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.) Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)
   १) श्री नितीन गणपत पाटणकर वय ५५ वर्षे (अनुज्ञापन निरीक्षक)
   २) श्री. हरिश्चंद्र नानाभाऊ घोडमल वय ५३ वर्षे (अनुज्ञापन निरीक्षक)
   ३) श्री संदेश कलश्यर पॉल वय ४१ वर्षे (खाजगी इसम)

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 823

Scanned with CamScanner

यातील फिर्यादी नामे श्री. अरविंदसिंह नटुभा जाडेजा वय ६० वर्षे यांच्या स्वतंत्र पानावर संगणकावर टंकलेखील केलेला जबाब हाच प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(गणेश काळे)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई

જાડેજા. સો. સહી
16/2/2021
જાડેજા. અરવિંદસિંહ નટુભા

दिनांक–१६/०२/२०२१

# फिर्याद

श्री. अरविंदसिंह नटुभा जाडेजा, वय ६० वर्षे, व्यवसायः– सुपर मार्केट रा.ठि.–रूम.नं. १२, प्लॉट नं. १८९, आशिश सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, मंगलमृती जवळ, चारकोप सेक्टर नं.१, कांदिवली (प), मुंबई,– ६७ मो.न. ९८६९७४४६६६

---

मी वरीलप्रमाणे असुन उपरोक्त नमुद पत्त्यावर गेल्या २६ वर्षापासुन रहावयास आहे. माझे कुटूंबात माझी पत्नी व माझी दोन मुले रहावयास आहेत. मी "भूमी मार्ट"नावाचे सुपर मार्केट दुकान क्र. ०८ ते दुकान क्र. १५, शक्ती इनक्लेव्ह, शक्ती कॉम्पलेक्स, जनकल्याण नगर, बिला बॉग हॉयस्कुल समोर मालाड, (प) मुंबई – ९५ येथे भाडेतत्वावर सुमारे ०४ वर्षापासून चालवत आहे. सदर दुकान चालविण्यासाठी लागणारे सर्व प्रकारचे परवाना मी बृहन्मुंबई महानगर पालिका यांचेकडून प्राप्त केले आहेत. परंतु दुकानाच्या बाहेरच्या बाजुला दुकानाच्या नावाच्या साईन बोर्डची परवानगी मी अद्यापर्यंत घेतली नाही.

दिनांक ०५/०२/२०२१ रोजी साधारण ०२.०० वा चे सुमारास पी नॉर्थ वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, मालाड पश्चिम, मुंबई या कार्यालयातील लायसन्स विभागाचे लायसन्स इन्स्पेक्टर श्री. सुभाष चव्हाण, श्री. नितीन पाटणकर, व श्री. हरिशचंद्र घेगडमल असे तिघे माझे वरील "भूमी मार्ट" या सुपर मार्केट येथे आले. व त्यांनी मला माझे दुकानाच्या साईन बोर्डमध्ये लाईट असल्यामुळे तो अनधिकृत असल्याचे सागुन मला. दंडाची नोटीस दिली व दोन दिवसात बृहन्मुंबई मलानगरपालिकेच्या पी नॉर्थ ऑफिसच्या आठव्या माळयावर येवून भेटण्यास सांगितले.

दिनांक १०/०२/२०२१ रोजी मी व माझा मित्र खोडीलाल पटेल असे पी नॉर्थ ऑफिसच्या आठव्या माळयावर जावून इन्स्पेक्टर श्री. सुभाष चव्हाण यांना भेटुन आम्हाला देण्यात आलेल्या नोटीस बाबत विचारणा केली असता त्यांनी आम्हाला श्री. पाटणकर येऊ दया काहितरी मधला मार्ग काढतील असे बोलून त्यांनी पाटणकर यांना फोनकरून बोलविले. थोडया वेळातच तेथे पाटणकर आले व श्री. सुभाष चव्हाण साहेबानी श्री. नितीन पाटणकर साहेब यांच्याशी चर्चा करण्यास आम्हाला सांगितले. मी व माझा मित्र खोडीलाल असे चर्चा करण्याकरीता श्री. नितीन पाटणकर यांना भेटलो असता त्यांनी आम्हाला श्री. हरिशचंद्र घेगडमल यांचे कार्यालयात घेवून गेले व मला दिलेल्या नोटीसबाबत किती फाईन होतो याची माहिती काढण्याचे सांगुन कार्यालयाच्या बाहेर निघून गेले. त्यानंतर श्री. घेगडमल यांनी माझ्या दुकानाच्या समोरील बाजुचे बोर्डासाठी २,५८,०००/– रूपये व उजव्या बाजुचे बोर्डासाठी १,३२,०००/– रूपये दंड भरावा लागेल असे सांगितले. त्यावर मी त्यांना हा दंड खुप जास्त आहे असे सांगितले असता त्यांनी श्री. पाटणकर साहेबाना बोलावतो असे सांगुन श्री. पाटणकर साहेबाना बोलाविले. श्री. घेगडमल यांनी वर नमुद दंडात्मक माहितीचा कागद श्री. पाटणकर साहेब यांना दिला. त्यावर मी श्री. पाटणकर यांना सदरचा दंड हा खुप जास्त आहे असे सांगितले. त्यावर त्यांनी त्यांचे वरिष्ठ अधिकारी श्री. चव्हाण यांच्याशी चर्चा करून येतो असे सागुन ते श्री. चव्हाण यांच्या कार्यालयात जावून त्यांना भेटुन दहा मिनिटानी परत आले व आम्हाला बोलले की, पुढच्या बाजुच्या बोर्डासाठी १,५०,०००/– रूपये व उजव्या बाजुच्या बोर्डासाठी ७५,०००/– रूपये लाच दयावी लागेल. व पुढच्या बोर्डासाठी ५०,०००/– रूपये व उजव्या बाजुच्या बोर्डासाठी ३०,०००/– रूपये कायदेशीर पावती फाडावी लागेल. त्यांनतर मी त्यांना सदरची रक्कम खुप जास्त असल्याचे सांगितले व सदरचे दुकान भाडयाचे असल्याचे सांगुन एवढी रक्कम कोठून भरू असे विचारले असता श्री. पाटणकर साहेब बोलले की, विचार करून सांगा. त्यानंतर आम्ही त्यांना विचार करून सांगतो असे बोलून निघून आलो.

Scanned with CamScanner

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वरील अधिकाऱ्यांना मला लाच द्यावयाची ईच्छा नसल्याने मी व माझा मित्र खोडीलाल पटेल असे दिनांक ११/०२/२०२१ रोजी. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे वरील अधिकारी यांच्या विरूध्द लेखी तक्रार दिली.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने श्री. पोनि कानडे यांनी दोन सरकारी पंचांना पाचारण करून त्यांची माझेशी ओळख करून दिली. व पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि. कानडे यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पोनि कानडे यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला.

पोनि कानडे यांनी दिनांक ११/०२/२०२१ रोजी पंचांसमक्ष पी नॉर्थ वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, मालाड (प), मुंबई येथे पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यांनुसार पो.नि. कानडे, सपोआ आबासाहेब पाटील व दोन पंच आणि पोलीस पथक हे ला.प्र.वि कार्यालयातून निघून पठाणवाडी मालाड, हायवे या ठिकाणी थाबलो. तेथे पो.नि. कानडे यांनी मला व माझा मित्र श्री. खोडीलाल पटेल यांना व पंच श्री. कऱ्हाळे यांना पडताळणीच्या वेळी घ्यावयाच्या खबरदारीबाबत सुचना दिल्या व लोकसेवक यांची भेट घेण्याकरीता माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून लावण्यात येवून पी नॉर्थ वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, मालाड (प),मुंबई येथे माझे मित्र श्री. पटेल यांचे वाहन क्र. एम.एच.४७ एएन २२७७ यांच्या वाहनातुन गेलो.

त्यांनतर आम्ही पी नॉर्थ वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, मालाड (प),मुंबई च्या आठव्या माळयावरील श्री. सुभाष चव्हाण यांच्या कार्यालयात गेलो असता तेथे श्री. पाटणकर देखील उपस्थित होते त्यांवेळी श्री. पाटणकर यांना मी मला आकारण्यात आलेला दंड कमी करण्याबाबत बोललो असता त्यांनी मला " सिर्फ एक हि बार बात होती है.... बार बार बोलना अच्छा नही." असे बोलून " पेपर का बात करने का है. करलो बाकी का उधर बोलते है अपुन " असे सागुन आम्हाला श्री. घेगडमल यांचे कार्यालयात बसण्यास सांगितले. व ते श्री. चव्हाण यांच्या कार्यालयात चर्चा करण्याकरीता थांबले. आम्ही श्री. घेगडमल यांच्या कार्यालयात त्यांच्या बरोबर चर्चा करत असताना श्री. पाटणकर हि त्यांच्या कार्यालयात आले. त्यावेळी मी त्यांना मला आकारण्यात आलेल्या दंडा बाबत विचारणा करून "किधर गया वो कल का लिस्ट दिखाओ जरा, कितना बोले थे साहब, लिखा था..." असे विचारले असता श्री. हरिशचंद्र घेगडमल मला बोलले की, "मेने वो तुमको दिया, दोनो का मैने दो बोला था त्यांनतर पाटणकर बोलले की, " जैसा बोले, तुम्हारी क्या इच्छा है. ..., अरे बाबा अभी हमको मत निचे लावो तुम." त्यांनतर मी त्यांना लॉकडाऊन मध्ये दुकान बंद असल्याने व दुकान भाडयाचे असल्याने मला खुप नुकसान झाल्याने मला परवडत नसल्याचे मी त्यांना सांगितले असता श्री. हरिशचंद्र घेगडमल बोलले की, "वो लमसम हि सब बताया ना आपको." त्यांनतर मी श्री. पाटणकर यांना श्री. हरिशचंद्र घेगडमल यांनी कागदावर लिहुन दिलेले ७०,०००/– रूपये हे जास्त होतात असे सांगितले असता श्री. पाटणकर बोलले की, " ये जो है तुम्हारा वन टाईम है, तुम चालीस बोलता है ना, मेरा तिस हि दे दो, ये फि भरो..." असे बोलुन, "६५ करो, पाच कम कर रहा हु" असे बोलले. त्यावर मी त्यास आणखी कमी करण्यास बोललो असता श्री. पाटणकर बोलले की, " ये क्या भाजीभाव करने का है क्या आपको, ये बी.एम.सी. ऑफीस है. ऐसा नही होता है., ६० कर दो लास्ट" असे बोलून दुसऱ्या दिवशी १२.०० वा भेटण्यास सांगितले.

Scanned with CamScanner

त्यानंतर मी, माझे मित्र पटेल व पंच असे पठाणवाडी मालाड, हायवे येथे आलो असता पो.नि. कानडे यांनी डिजीटल रेकॉर्डर बंद केला.व व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकून लोकसेवक यांनी पडताळणी दरम्यान स्पष्ट लाचेची मागणी झाल्याचे निष्पन्न झाले.

दिनांक १२/०२/२०२१ रोजी पोनि कानडे, सपोआ आबासाहेब पाटील, दोन पंच व पोलीस पथक हे ला.प्र.वि कार्यालयातून निघून माझे मित्र श्री. खोडीलाल पटेल हे राहत असलेल्या ए/१०२, ॲरिस लियो सगितारीयस को.ऑ.हौ.सो.लि., जनकल्याण नगर, मार्वे रोड, मालाड, (प) मुंबई या ठिकाणी आलो. त्यानंतर पोनि कानडे यांनी मला लोकसेवक यांनी लाचेच्या रकमेची मागणी केली असुन आज रोजी सापळा कारवाई करावयाची आहे असे सांगितले. त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर माझे कडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. ६०,०००/– (रू. २,०००/– दराच्या ३० भारतीय चलनी नोटा) स्वत:चे ताब्यात घेतली. सदर नोटांना ॲथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले. तसेच पोनि कानडे यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला व माझा मित्र पटेल यांना डावा हात डोक्यावरून फिरवून पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर माझे मित्र पटेल याचे उपरोक्त नमुद राहते घरी पंचासमक्ष लाचेच्या रकमेस ॲथ्रासीन पावडर लावली व श्री. पाटणकर यांनी सांगितल्याप्रमाणे माझा मित्र पटेल यांनी त्यांच्या मोबाईल फोनवर श्री. पाटणकर यांना संपर्क साधला असता श्री. पाटणकर यांनी सांगितले की, मला शॉपींग करावयाची असल्याने मी सायकाळी ०६.०० वाजता 'भुमी मार्ट' येथे येणार आहे.'' असे सांगितले.

त्यांनतर सायंकाळी पोलीस पथक व पंचांसह सापळा कारवाईकरीता माझे भूमी मार्ट, दुकान क्र. ०८ ते दुकान क्र. १५, शक्ती इनक्लेव्ह, शक्ती कॉम्पलेक्स, मालाड (प), मुंबई येथे सायंकाळी १७.०० वा.च्या दरम्यान सापळा लावण्यात आला. त्यांनतर श्री. पाटणकर हे सायंकाळी ०७.०० वा पावतो आले नसल्याने माझा मित्र श्री. पटेल यांनी त्यास मोबाईलद्वारे संपर्क साधला असता श्री. पाटणकर यांनी सांगितले की, ते कामा निमित्त बाहेर गेले असून सोमवार दिनांक १५/०२/२०२१ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० वा च्या दरम्यान फोन करून त्यांच्या कार्यालयात येण्यास सांगितले.

दिनांक १५/०२/२०२१ रोजी पोनि कानडे, सपोआ आबासाहेब पाटील, दोन पंच व पोलीस पथक हे ला.प्र.वि कार्यालयातून सकाळी ०९.३५ वा कार्यालयातुन निघून माझे मित्र श्री. खोडीलाल पटेल यांच्या वर नमुद पत्यावर आलो. त्यानंतर पोनि कानडे यांनी मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर माझे कडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. ६०,०००/– (रू. २,०००/– दराच्या ३० भारतीय चलनी नोटा) स्वत:चे ताब्यात घेतली सदर नोटांना ॲथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले. तसेच पोनि कानडे यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर माझा मित्र पटेल यांना डावा हात डोक्यावरून फिरवून तसेच त्यांच्या मोबाईल फोनवरून सपोआ आबासाहेब पाटील यांच्या फोनवर मिस कॉल देवून पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले. त्यानंतर श्री. पाटणकर यांनी सागितल्याप्रमाणे त्यांच्या मोबाईलवर माझा मित्र पटेल यांनी फोन करून विचारले असता त्यांनी ते कामा निमित्त बाहेर असून श्री. हरिशचंद्र घेगडमल यांना भेटण्यास सागून १२.३० वा नंतर ते कार्यालयात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

Scanned with CamScanner

त्यांनुसार पोनि कानडे, सपोआ आबासाहेब पाटील, दोन पंच व पोलीस पथक असे पी नॉर्थ वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, मालाड पश्चिम, मुंबई या ठिकाणी १२.४५ वाजताच्या सुमारास आलो. त्यांनतर मी माझा मित्र व पच श्री. रमेश कऱ्हाळे असे आठव्या माळयावरील लायसन्स विभागाचे कार्यालयात गेलो असता श्री. पाटणकर याचे कार्यालय बंद होते म्हणून आम्ही श्री. हरिशचंद्र घेगडमल यांच्या कार्यालयात जावून बसलो. व त्यांच्याशी साईन बोर्ड संदर्भात चर्चाकरून श्री. पाटणकर साहेब यांचे बाबत विचारले असता त्यांनी ते बाहेर गेले असल्याचे सांगितले. त्यामुळे माझे मित्र श्री. पटेल यांनी श्री पाटणकर यांना मोबाईलवरून संपर्क केला असता ते थोडया वेळाने त्यांच्या कार्यालयात येणार असल्याचे सांगितले. थोडया वेळात श्री. पाटणकर हे त्यांच्या कार्यालयात आले. मी माझा मित्र पटेल असे श्री. पाटणकर याचे कार्यालयात जावून लाचेच्या रक्कमेबाबत त्यांना बोललो असता श्री. पाटणकर हे बाहेर जावून तेथे उपस्थित असलेल्या एका व्यक्तीस त्यांच्या सोबत कार्यालयात घेवून आले व त्यांच्याकडे बोट दाखवून बोलले की, "उसके पास दे के डालो... टेन्शन नही...मेरा हि खास आदमी है"त्यानंतर मी माझेकडील लाचेची रक्कम श्री. पाटणकर यांनी सांगितलेल्या इसमाकडे दिली त्यांनी सदरची रक्कम त्यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवली त्यांनतर माझा मित्र श्री. पटेल यांनी बाहेर जावून त्यांच्या मोबाईलवरून सपोआ आबासाहेब पाटील यांना मिस कॉल दिला व कार्यालयाच्या बाहेर येवून डोक्यावरून डावा हात फिरवून पुर्वनियोजीत इशारा केला. तात्काळ पोलीस पथक श्री. पाटणकर यांचे कार्यालयात येवून श्री. पाटणकर व तेथे हजर असलेला खाजगी इसम नामे सुदेश कलथ्थुर पॉल याला लागलीच पोलीसांनी रू.,६०,०००/– लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडले. तसेच बाजुच्या कार्यालयातील हजर असलेले श्री. हरिशचंद्र घेगडमल यांचा दिनांक ११/०२/२०२१ रोजीच्या पडताळणी दरम्यान त्यांचा देखील गुन्हयात स्पष्ट सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना देखील ताब्यात घेतले.

तरी माझे "भूमी मार्ट" या सुपर मार्केट दुकानाचे लाईटचे साईन बोर्ड अनधिकृत असल्याचे सांगुन दिनांक ०५/०२/२०२१ रोजी पी नॉर्थ वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, मालाड (प), मुंबई येथील लायसन्स विभागाने दंडाची नोटीस बजावून कार्यालयात बोलावून लायसन्स इन्स्पेक्टर श्री. नितीन पाटणकर, व हरिशचंद्र घेगडमल यांनी नोटीसची दंडात्मक रक्कम कमी करण्याकरीता २,२५,०००/– रूपये रक्कमेची लाचेची मागणी करून तडजोडी अंती दिनांक १५/०२/२०२१ रोजी खाजगी इसम नामे श्री. सुदेश कलथ्थुर पॉल यांच्या मार्फतीने ६०,०००/– रूपये लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन माझी लायसन्स इंस्पेक्टर श्री. नितीन पाटणकर, श्री.हरिशचंद्र घेगडमल व खाजगी इसम श्री. सुदेश कलथ्थुर पॉल याचेविरूध्द तक्रार आहे. माझे इन्स्पेक्टर श्री. नितीन पाटणकर व श्री.हरिशचंद्र घेगडमल यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असून ती मला हिंदीतून समजावुन सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

(गणेश कानडे),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with CamScanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ
Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........
Total Value of properties stolen / involved
(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

नमुद ता. वे. व ठिकाणी यातील "फि" यांचे दुकानाचे लाईटचे साईन बोर्ड अनाधिकृत आहेत असे सांगुन दंडाची नोटीस देवून कार्यालयात बोलावून आलोसे क्र. १ व २ यांनी "फि" यांचेकडे २,२५,०००/- रु. ची लाचेची मागणी करुन तडजोडी अंती दिनांक १५/०२/२०२१ रोजी आरोपी क्र. ३ यांचे मार्फतीने ६०,०००/- रु लाचेची रक्कम स्विकारली म्हणून गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
गणेश कानडे, पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :
(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No........ to take up the Investigation or
(2) Refused Investigation due to........ (3) Transferred to P. S. ........ District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

16/2/2021

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name गणेश कानडे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई
Posting
Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with CamScanner